**WORKSHOP ON " CIVIL DEFENSE "**

(अग्निसुरक्षा आणि प्रथमोपचार जनजागृती अभियान )

UNDER

**TECHNICAL EDUCATION QUALITY IMPROVEMENT PROGRAMME**

**(TEQIP PHASE III)**

**(6TH APRIL, 2018)**

ORGANIZED BY

**SARDAR PATEL COLLEGE OF ENGINEERING**

(GOVERNMENT AIDED AUTONOMOUS INSTITUTE PERMANENTLY AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI)

ANDHERI, (WEST), MUMBAI – 400 058.


सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने सदर कार्यशाळेचे आयोजन दिनांक 6 एप्रिल 2018 रोजी करण्यात आले. सुरुवातीला संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रियदर्शी ह. सावंत, उपप्राचार्य डॉ. मोहन मुरुडी, टेक्युप समन्वयक डॉ. राहुल दहातोंडे, कार्यक्रमाचे दोन्ही समन्वयक श्रीमती विद्युल्लता जोशी व डॉ. सुधाकर उमाळे, यांनी सर्व सहभागी प्रशिक्षणार्थीना संबोधित केले.



या कार्यशाळेसाठी नागरी संरक्षण दल बृहन्मुंबई (गृह विभाग महाराष्ट्र शासन) येथील श्री. मिलिंद जाधव सर व श्री. प्रशांत शिरोडकर सर यांना आमंत्रित करण्यात आले. संस्थेच्या वतीने दिलेल्या सदर आमंत्रणाचा मान राखून त्यांनी महाविद्यालयातील या प्रशिक्षणासाठी सहभागी झालेल्या सर्व प्रशिक्षणार्थींना संबोधित केले.








त्यांनी आग लागण्याचे वेगवेगळे प्रकार, त्यांची कारणे, कोणत्या प्रकारची आग कशा प्रकारे विझेल, रासायनिक अग्निशमक (Fire Extinguisher) कशा प्रकारे वापरावा, प्रथमोपचार (First Aid ) म्हणजे काय ? आग लागल्यावर कोणती काळजी घ्यावी, आग विझविताना कोणती काळजी घ्यावी, रोगाचे निदान करुन त्यांची लक्षणे लक्षात घेऊन दुर्घटनास्थळी त्याच ठिकाणी व त्याच वेळेत प्रथमोपचार कसे करावेत, काही महत्वाचे दुरध्वनी क्रमांक, रुग्णाशी सौम्यतेने कसे वागावे, त्याला आधार दयावा , कशा प्रकारे मदत करावी, याची इत्यंभुत माहिती दिली.






त्यांनी सर्व सहभागी प्रशिक्षणार्थींना संस्थेच्या इमारतीच्या बाहेर परीसरात नेऊन आग कशी विझवावी, अग्निशमक (Fire Extinguisher) कशा प्रकारे वापरावा याचे प्रात्याक्षिक, आणिबाणीच्या प्रसंगी दोरखंडाच्या सहाय्याने आपतग्रस्तांना मदत करण्यासाठी दोरखंडाच्या निरनिराळया गाठी  तयार करण्याचे वेगवेगळे प्रकार, आणिबाणीच्या प्रसंगी ओढणीच्या सहाय्याने बॅन्डेजस कसे बनवावे व कसे वापरावे ? याचे सुरेख प्रात्यक्षिक दाखविले व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.


VID_20180406_124842
00:02
14:41


VID_20180406_124842
03:20
14:44

सरते शेवटी संस्थेच्या वतीने  नागरी संरक्षण दल बृहन्मुंबई (गृह विभाग महाराष्ट्र शासन) येथील श्री. मिलिंद जाधव सर  व श्री. प्रशांत शिरोडकर सर यांचे आभार मानुन त्यांना  टोकण ऑफ लव म्हणून भेटवस्तु देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.






या कार्यक्रमासाठी श्री. लुईस डायस यांनी कार्यशाळा समन्वयक व श्री. संदीप तळेकर व श्रीमती समिधा वालावलकर यांनी कार्यशाळेचे आयोजक म्हणून काम पाहीले.